वार्षिक अहवाल
२००४-२००५



जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि.,अमरावती.

मुख्य कार्यालय : १ ला माळा, खत्री कॉम्पलेक्स, वालकट कंपाऊंड अमरावती. फोन : २५६००५७, २५७००५६, २५६६१५६

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती

मुख्य कार्यालय : ५ वा माळा, खत्री कॉम्प्लेक्स, वालकट कंपाऊंड, अमरावती
फोन - २५६००५७, २५७००५६, २५६६५५६

संचालक मंडळ (२००५-२००६)

इंजि. अविनाश अ. कोठाळे, M.E. LL.B. MBA, DMM चेअरमन इन-लिडर	[illegible]	(O) 2571[illegible]
इंजि. राजेंद्र. शं. माधव, B.E. (Mech.) व्यवसाय	[illegible]	(O) 2561[illegible]
डॉ. सुनिल पं. देशमुख, BUDS, MDS डॉजि. अरविंद गावंडे,	[illegible]	(O) 2670709
B.E. (Civil), D.I. प्रकल्प सल्लागार, रेडक्रॉस सोसा इंजि. दिनकर मुगुल,	संचालक	(O) 2663[illegible]
B.C.E.T. सिव्हिल - [illegible] अॅड. अनिल कडू,	संचालक	(O) 265[illegible]
B.Sc., LL.B. सदस्य ग्राहक तक्रार निवारण फोरम, अमरा डॉ. अनिल रा. चौधरी,	[illegible]	(O) 2551052
M.B.B.S., M.D., एकनाथराव आ. मोहोड,	[illegible]	(O) 26754[illegible]
B.Com., D.C.S.M. रामभाऊ बळी,	[illegible]	(O) 257[illegible]
M.Sc. (Agri.) इंजि. प्रदीप वानखडे,	संचालक	(O) 2[illegible]
B.E. (Civil), DBM गजानन बोंडे,	[illegible]	(O) 255[illegible]
B.Sc., B.Ed., डॉ. सौ. विमलताई अलाडे,	[illegible]	(O) 25[illegible]
M.Sc. Ph.D. सौ. किरणताई महल्ले,	[illegible]	(O) [illegible]053
M.A., LL.B. डॉ. सौ. प्रतिभाताई विधळे,	संचालिका	(O) 2[illegible]070
M.Sc., M.Ed. सौ. सुमनताताई वावरे,	संचालिका	(O) 25[illegible]16
M.A.		(O) 2[illegible]239

* सन्माननीय संचालक *

इंजि. अविनाश अं. कोठाळे

अध्यक्ष

ME., L.E., ADIM. (IMM.

[illegible]

169, वशिष्ठ नगर, पार्ट प्लॉट २, अमरावती.

इंजि. राजेंद्र गं. जायस

उपाध्यक्ष

BE (Mech.)

[illegible]

[illegible], [illegible], अमरावती.

डॉ. सुनिल प. देशमुख

MBBS, M.D.

[illegible]

[illegible], पालक्की [illegible]

[illegible], [illegible], अमरावती.

इंजि. अरविंद गायंके

B.E.(Civil), DIT

[illegible]

[illegible], पालक

[illegible]

[illegible], [illegible], अमरावती.

इंजि. दिनकरराव भुगुल

D.C.A.E.

[illegible]

[illegible]

[illegible], अमरावती.

ॲड. अनिल कडू

B.Sc. LL.b

[illegible]

[illegible], [illegible], अमरावती.

डॉ. अनिल बोंडे

MBBS, M.D.

[illegible]

[illegible], [illegible]

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती

मुख्य कार्यालय : १ ला माळा, खत्री कॉम्प्लेक्स् वालकट कंपाऊंड, अमरावती
फोन – २५६००५७, २५७००५६, फॅक्स (०७२१) २५६६१५६

अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींग

क्र. जिजाऊ/अम्रावा/५/८३१/२००५
दि. २९ जुलै २००५

सन्माननीय,
भागधारक सभासद,
सस्नेह नमस्कार,

जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँक लि., अमरावती ची वार्षिक सर्व साधारण सभा शनिवार, दि. १३/८/२००५ रोजी सायंकाळी ४.३० वाजता, शहीद स्मारक सभागृह टाऊन हॉल, राजकमल चौक, अमरावती येथे खालील विषयानुसार कामकाज चालविण्या करीता आयोजित केलेली आहे. तरी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

संचालक मंडळाचे आदेशानुसार

शंकरराव राऊत
मुख्य कार्यकारी अधिकारी

सभेची विषय पत्रिका :

१. मागील आमसभा दि. १४.८.२००४ चे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. सन २००४-२००५ (३१ मार्च २००५) अखेर हिशोबाची पत्रके, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक मंजूर करणे.
३. सन २००४-०५ ह्या वर्षात झालेल्या नफ्याचे विनियोजनास संचालक मंडळाच्या शिफारशीनुसार मंजूरात देणे.
४. बँकेचे सन २००५-०६ ह्या वर्षाचे अंदाज पत्रक मंजुर करणे. २००४-२००५ चे प्रत्यक्ष खर्चास मंजूरात देणे.
५. बँकेचे पोटनियम दुरुस्ती प्रस्तावास मान्यता देणे.
६. बँकेची बाहेरील कर्ज उभारणीची मर्यादा ठरविणे.
७. बँकेचे अंतर्गत तपासणी करीता ऑडीटरची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकाकडील कर्ज प्रकरणाची नोंद घेणे.
९. २००४-२००५ चे ऑडीट नोट अवलोकन करणे.
१०. मा. अध्यक्षांचे परवानगीने पटलेवर येणारे विषय.

टिप :- १. गणपूर्ती अभावी तहकुब झालेली सभा लगेच ९ वाजता नंतर त्याच दिवशी त्याच विषय वर त्याच ठिकाणी घेण्यात येईल त्या वेळेस गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. बँकेचे कामकाजा विषयी कोणताही प्रश्न विचारावयाचे असल्यास असे प्रश्न लेखी स्वरूपात सभेपूर्वी ३ दिवस अगोदर पाठवावे व नोंद घ्यावी.
३. बँकेच्या भागधारकांनी बचत खाते उघडून लाभांश धनादेश जमा करावेत, ही विनंती.
४. ज्या भागधारकांनी भागप्रमाणपत्रे नेलेली नसतील त्यांनी बँकेच्या मुख्यकार्यालयातुन घ्यावेत तसेच वारसाची (नॉमिनी) नोंद बँकेच्या दप्तरी करावी.

नियमानुसार २ कोटी भागभांडवल अमरावती जिल्हयामध्ये राखीव ठेवणेकरिता आवश्यक आहे. त्याकरीता सभासदांनी आपले भागभांडवल वृध्दींगत करणे आवश्यक आहे व प्रत्येक सभासदाने एक नवीन सभासद किमान रू. ५०००/- एवढ्यापुरते भागभांडवल वेगाने तसेच निजाऊ परिवारचे आदर्श ठेवीदारांना बँकेला सुचविणे आवश्यक आहे.



निधी –

राखीव व इतर निधी मध्ये इमारत निधी, लाभांश समिकरण निधी, बाईट व संशयित निधी तरतुद, बटघट निधी, गुंतवणूक व जोखिम निधीचा समावेश असुन सन २००४ मध्ये रू. ४०.५९ लक्ष असलेल्या सदर निधी २००४-२००५ या वर्षात रू. ११५.०३ लक्ष झालेला आहे. सदर निधीमध्ये ११७०.०८ टक्के विक्रीची वाढ आहे. कॅपिटल रिस्क वेटेड असेट रेशो (CRAR) संकल्पना सहकारी बँकेसाठी अनिवार्य केलेली असुन R.B.I. ने CRAR किमान ९ टक्के अनिवार्य केला असुन १२ टक्के पर्यंत वाढविण्याकरिता सुचविले आहे. अहवाल वर्षात बँकेची भाडवल पर्याप्तता २०.१२ टक्के आहे. सदर भागभांडवल परताव्या रेशो वाढविण्याकरीता व बँकेच्या सुरक्षितेकरिता सदर निधीची वाढ होणे बँकेच्या सुरक्षिततेचे लक्षण आहे.



ठेवी –

सन २००५ मध्ये रू. १४४२.३७ लक्ष ठेवी होत्या त्यामध्ये २०१.१६ लक्ष वाढ होवून अहवाल वर्षात रू. १६४३.१४ लक्ष आहेत ठेवीमध्ये १३.९५ टक्के वाढ प्रगतीचे व ठेवीदारांचा बँकेवर असलेल्या विश्वासाहर्तेचे प्रतिक आहे. अहवाल वर्षात बँकेला सर्व तरतुदी करून निव्वळ नफा २० लक्ष आहे. कर्जरोख्यातून चालु वर्षात नफा मिळालेला नसुन केवळ कर्जधारकाची नियमित परतफेडीतून व दैनंदिन कामकाजातुन नफा मिळालेला आहे.

बँकेच्या प्रगती व सांपत्तीक स्थिती खालील तक्त्यावरून अधिक स्पष्ट होईल. (आकडे लाखात)

वर्ष	सभासद	भागभांडवल (रू.)	राखीव व इतर निधी (रू.)	ठेवी (रू.)	कर्ज	गुंतवणूक	खेळते भांडवल	निव्वळ नफा (रू.)	डिव्हीडंट (%)	अभिप्राय
१९९८-९९	१५८५	२१.५२	०.१८		--	--	--	०.१६	--	ऑडिट निल
१९९९-००	१७१६	२४.९६	०.१७	--	--			०.०७	--	ऑडिट निल
२०००-०१	१७८५	२१.३८	२.५१	३६२.१८	२०३.४४	३४	२०६.७०	१०.०२	--	२ लाख ७००० सुधारीत
२००१-०२	१९३८	५०.४६	४.७०	८७५.०८	६००.७५	५३	६३५.८३	१०.७३	अ	अ
२००२-०३	२१९७	६०.७०	६३.५८	१०५३.४२	८३९.१०	२५१.६२	१२७४.७५	१२.३५	अ	१०% डिव्हीडंट प्रस्तावित
२००३-०४	२३७१	७९.६४	५२.५९	१४५२.७७	५०८९.०८	५६८.८७	१४५८.२३	५० २९*	अ	रू. ७०/-
२००४-०५	२४८६	१०६.०३	१९६.७०	१६४३.१४	१३०१.६१	५४१.१६	२०५५.६९	३०.००	१	११% डिव्हीडंट

उत्पन्न व खर्च दर्शक आलेख वरून बँकेला महत्त्वाचे उत्पन्न हे कर्जातील व्याजातुन मिळते हे स्पष्ट होते तर खर्चामध्ये ठेवीवरील व्याज व तरतुदींचा मोठा वाटा आहे.





ठेवीदारांची सुरक्षितता :-

जिजाऊ बँक ठेवीदारांनी द.सा.द.शे. ६.०% ते ८.५% पर्यंत ठेवीवर मुदतीनुसार व्याज देते. जेष्ठ नागरीकांना ०.५% व्याज दर जास्त देण्याबाबत संचालक मंडळाने तरतुद केलेली आहे. तसेच ठेवीच्या सुरक्षेकरीता रिझर्व बँकेचे अधिनीयमांतर्गत विना अडचण जमा रक्कमांचे नियमीतपणे बँक सर्व ठेवीवर विना रक्कम जमा करते. अहवाल वर्षात रू. २.४५ लाख बँकेने गुंतविले आहे. एक लक्ष रूपये प्रत्येक ठेवीकरीता सुरक्षितता प्रदान करण्यात येते. राष्ट्रीयकृत बँकापेक्षा २ टक्के व इतर सहकारी बँकांपेक्षा ०.५ टक्के अधिक दर आमच्या बँकेचे आहेत. बँकेचा खर्च आटोक्यात असल्याने ठेवीदारांना जास्त व्याज दराचा फायदा देण्यात येतो.

बँकामधील गुंतवणुक :-

जिजाऊ बँकेने अहवाल वर्षात विविध बँकामध्ये एकुण रूपये ६०.५५ लक्ष गुंतवणुक केली आहे. रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार १०% सहकारी बँकमध्ये व २५% शासकीय प्रतिभुतिमध्ये गुंतवणुक करण्याबाबत निर्देश आहेत. सुनियोजित गुंतवणुक करण्यावर संचालक मंडळाचा विशेष आग्रह असतो.

शासकीय प्रतिभुतीमधील गुंतवणूक :-

जिजाऊ बँकेची एकुण रूपये ४८१.३० लक्ष गुंतवणुक सहकारी बँकामध्ये आहे. मुदत व मागणी देवता रक्कमेच्या १५% रक्कम किमान सरकारी रोख्यामध्ये गुंतवणुक करणे रिझर्व बँकेने अनिवार्य केले होते. शासकीय प्रतिभुतीचे चालु वर्षातील दर अत्यंत अस्थिर व अनिश्चीत असुन आंतरराष्ट्रीय बाजार पेठेत व्याजदर व भारतीय अर्थ व्यवस्थेतील व्याजदर वाढीचा फटका या क्षेत्राला बसल्यामुळे शासकीय रोख्यांचे दर्शनी किंमतीमध्ये घट झालेली आहे. आमच्या बँकेकडे असलेल्या शासकीय रोख्यांचे विवरण खालील प्रमाणे आहे. (आकडे लाखात)

Sr. No.	Held to Maturity		Held to Sale	
1.	5.69 GOI 2018	Rs. 35.60	7.46 GOI 2017	Rs. 50.00
2.	6.01 GOI 2028	Rs. 80.70		
3.	6.13 GOI 2028	Rs. 75.00		
4.	6.17 GOI 2023	Rs. 90.00		
5.	6.25 GOI 2018	Rs. 150.00		
	TOTAL	Rs. 431.30	TOTAL	Rs. 50.00

शासकीय प्रतिभुतिच्या व्याजातुन अहवाल वर्षात रूपये ३०.३० लक्ष व्याज मिळाले व खरेदी विक्रीमध्ये १.३४ लक्ष मिळाले आहे. ३.५६ टक्के हा व्याजदर असुन २०१८ या वर्षापर्यंत सदर प्रतीभुती देय असणार आहे. सदर गुंतवणुकीचा जोखिम कमी करण्याकरीता रू. २.४५ लक्ष तरतुद बँकेने अहवाल वर्षात केलेली आहे.

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती

मुख्य कार्यालय : १ ला माळा, खत्री कॉम्प्लेक्स्, वालकट कंपाऊंड, अमरावती
फोन - २५६००५७, २५७००५६, फॅक्स (०७२१)२५६६१५६

आदरणीय सभासद,

सहकार बंधु व भगिनिंनो,

स्नेह पूर्वक जय जिजाऊ !

अमरावती,

२६ जुलै २००५ राजर्षी शाहू महाराज जयंती

आपल्या जिजाऊ कमर्शियल को ऑप बँकेचा सन २००४-२००५ या आर्थिक वर्षांचा अहवाल सादर करतांना सहकार क्षेत्रातील अमरावती जिल्हयातील आपली बँक निश्चितपणे अत्यंत विकासाने, स्थैर्याने, विश्वासार्हतेने संकल्पपूर्तीच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे आपल्याला सांगताना अभिमान वाटतो.

राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊंच्या संकल्पनेतील स्वतंत्र राज्य, सर्वांसाठी स्वातंत्र्य व सामाजिक न्यायाचे नितिमुल्य या सतराव्या शतकातील ऐतिहासिक वारसांचा आदर्श, २१ व्या शतकात नव्या संदर्भाने आपल्याला सामाजिक बांधिलकी व अर्थसंपन्न समाज निर्मितीसाठी एकसंघ देतो ही निश्चितच प्रेरणादायी बाब आहे ! माँ जिजाऊंच्या स्मृति सदैव मनात तेवत ठेवून आर्थिक संपन्न समाज निर्मितीचे स्वप्न साकार करण्याकरीता आपल्या बँकेच्या भागधारकांनी, ठेवीदारांनी, बँकेवर दर्शविलेला विश्वास अभिनंदनीय आहे. मराठा सेवा संघाच्या Pay Back to Society या भावनेने शिक्षित समाजाने स्वतःसाठी, कुटूंबासाठी जगत असतांना समाजासाठी व राष्ट्रासाठी योगदान देवून सहकाराचा बँकेतली आर्थिक व्यवहार शिस्तबद्ध नेण्याकरीता आपल्या सर्वांची निःस्वार्थीपणे साथ मिळेल हा मला विश्वास वाटतो !

सहकार क्षेत्रातील आपल्या बँकेने सामाजामध्ये नवा आर्थिक विश्वास निर्माण केला आहे. बँकेचे संचालक मंडळ विश्वस्त म्हणून विश्वस्तांच्या भावनेने सर्वोत्तम संचालकाचे बँकेप्रती, भागधारकाप्रती, प्रमाणिकपणे, निःस्वार्थीपणे सेवा दिलेली आहे, हे निर्विवादपणे नमूद करतांना मला अभिमान वाटतो.

बँकेच्या भविष्यातील प्रगतीकरीता आपला दर्जाचे सदैव सहकार्य मिळेल या अपेक्षेने बँकेच्या प्रगतीसाठी, भरभराटीसाठी नव्या उमेदीने सभासद, ठेवीदार, कर्जदार यांच्याशी आपुलकीचे संबंधाद्वारे वितुज करतांना सहकार क्षेत्रातील आपली जिजाऊ बँक अल्पावधीत जिल्हा बँकेच्या स्पर्धेमध्ये प्रगतीच्या आलेखाचे उच्चांक साध्य करीत आहे, हे नमूद करतांना अत्यानंद होतो. बँकेच्या पारदर्शी, आपलेपणाच्या दुरदृश्य सेवेचे स्वागतच सुरक्षातम् !



-: बँकेची प्रगती भागभांडवल व निधी :-

भागभांडवल -

७ ऑक्टोबर २००० ला विजया दशमीच्या शुभदिनी आपल्या बँकेने बँकींग व्यवसाय सुरू केला तेंव्हा २००४-२००५ या आर्थिक वर्षामध्ये एकुण २४४६ सभासदांचे रूपये १०२.१७ लक्ष भागभांडवल आहे. मागील वर्षाच्या २३०३ सभासदांचे ७९.६४ लक्षामध्ये २८.२८ टक्के वाढ झाली आहे. बँक स्थापने समयी १५३५ सभासदांचे रू. २१.५२ लक्ष असलेले भागभांडवल निश्चितपणे वाढलेले आहे. परंतु भारतीय रिझर्व बँकेच्या नविन

ठेवीवर देणे व्याज :-

ठेवीदारांचे देणे सर विनाकारण निरुपयोगरता अहवाल वर्षात व्याजाची तरतुद रु १५३.८९ लक्ष केली आहे.

रोखनिधी व तरती जिंदगी :-

रहल्ारी बँकांनी रिझर्व बँकेंग रेग्युरेशन ॲक्ट १९४९ मधील कलम १८ व २४ नुसार रोख निधी (CRR) व तरती जिंदगी (S.R) राखने अनिवार्य असल्याने बँकेने वर्षभर विहीत मर्यादा राखली आहे. बँकींग व्यवहार सांशिराज्यत असल्याने सतर मर्यादा धनाजूस आहेत.

कर्जव्यवहार :-

बँकने अहवाल वर्षपर्यंत एकुण रूपये १३०२.०१ लक्ष कर्जवाटप एकुण ७४३ कर्जधारकांना केले अहवाल वर्षात एकुण २२३.५१ लक्ष कर्ज वसुल केले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत कर्जवाटप मध्ये २८.९३ टक्के वाढ झालेली आहे. वर्षनिहाय कर्जप्रकारानुसार बँकेने वाटप केलेल्या कर्जाचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.

(आकडे रु. लक्षात)

अ.क्र.	कर्जाचा प्रकार	२०००-०१	२००१-०२	२००२-०३	२००३-०४	२००४-०५
१	कॅश क्रेडीट	६७.२६	२१२.१२	३१२.१८	४६४.८७	६६८.६९
२	मुद्दत तारण	६४.७०	१८३.१३	२३४.१३	२२७.३१	२३४.२२
३	वैयक्तिक तारण	२३.२०	९२.३५	११४.०४	१५३.३५	२५४.५५
४	हायपोथिकेशन	२३.२०	४०.९६	४८.००	३७.१२	३६.२९
५	वाहन कर्ज	५१.२८	३१.३८	४४.२४	४८.२९	५६.२३
६	पॅनकिलक	०३.४८	१७.८३	१६,८१	१२.९२	१७.११
७	मुदतीव तारण	०१.७०	१३.१३	२४.६२	२६.९४	४३.०६
८	शासकीय सेक्युरिटी	०.१७	०२.००	०४.५०	०७.५९	५.१२
९	बेल डिस्कॉऊटींग	--	००.५५	--	३१.०८	५.४४
१०.	इतर स्टाफ कर्ज	००.०५	००.०१	००.०७	००.०६	०.९०
	एकुण	२००.७४	६००.४५	७९९.१०	१००९.५०	१३०२.०१



अहवाल वर्षात बँकेने रिझर्व बँकेच्या मार्गदर्शनानुसार अग्रक्रम क्षेत्रास निर्धारित ६० टक्के कर्ज नुसार रू. ८२१.३२ लक्ष (६३.०८) टक्के कर्ज वाटप केले, तर दुर्बल घटकास निर्धारित २५ टक्केच्या तुलनेत रू २३६.२१ लक्ष (२९.१२) टक्के कर्ज वाटप केले आहे.

बँक सभासदांना, शिक्षण, घर खरेदी, प्लॉट खरेदी, शेती खरेदी, बांधकाम, व्यापार उद्योग विकास, आजारपण, वाहन खरेदी, मशिनरी खरेदी इत्यादी कारणाकरीत कर्ज उपलब्ध करून देते. अहवाल वर्षात बँकेने व्याजदर कमी केले. सध्या बँक व्याजदर २ लक्ष रूपयापर्यंत १२ टक्के आहे. नविन कार खरेदी करीता ७ टक्के सरळ व्याजदराने १० वर्ष मुदती करीता आहे.

कर्जवितरण व एन.पी.ए. तरतुद :-

बँकेने २००३-२००४ पर्यंत १००९ ला कर्ज वितरीत केले होते तर अहवाल वर्षात एकूण १३०२.०१ लक्ष कर्ज वाटप केले. अहवाल वर्षा रु. १७७.२६ लक्ष कर्जावरील व्याजातून मिळाले.

बँकेने अहवाल वर्षात रिझर्व बँकेच्या अनुषंगाने स्टँडर्ड एन.पी.ए. मार्गदर्शनानुसार एकूण रु.१८.०५ लक्ष रुपये एन.पी.ए. कर्ज दर्शविलेले आहे. बँकेने नक्त्यातून एन.पी.ए तरतुद रु. ५,८४,८०२/- केलेली आहे. बँकेजवळ ६०.९६ लक्ष वाईट व संशयित बुडीत कर्जासाठी जमा आहेत. सदर तरतुदीमुळे बँकेचे नक्त अनुत्पादक कर्ज ४.८१ टक्के आहे.

आपल्या देशाची अर्थव्यवस्था खुल्या स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यापार/एजेन्सीची सक्षमता सिद्ध होण्याकरीता रिझर्व बँकेने पुर्वीचे एन.पी.ए. चे ९८० दिवसाचे मार्गदंड ९० दिवस केले असून कर्ज खात्यावर व्याज तरसाही खात्यात ९० पेक्षा बंधन कारक केलेले आहे. तीन महिन्यात किस्त न आल्यास खाते अनुत्पादक समजण्यात येते. त्यामुळे कर्जदारांमध्ये "आर्थिक शिस्त" लावणे हा हेतू असल्याने कर्जदारांनी कर्जाची परतफेड नियमितपणे करावी अन्यथा कर्जदार बँकेला तोट्यामध्ये नेण्यासाठी जबाबदार राहतो. बँक तोट्यास आल्यास सर्वांच्या कार्यवाहिने सन्माननीय कर्जदाराकडून बँकेला कर्ज वसुल करावे लागते. त्यामध्ये तारण असलेली मालमत्ता विकणे, वसुलीपोटी दिलेले धनादेश न वटल्यास २ चा सजेची तरतुद असलेल्या निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे १३८ कलम अंतर्गत कोर्ट कार्यवाही करणे, सहकारी संस्था अधिनियम "७" नुसार वसुली प्रमाण पत्र प्राप्त करून स्थावर व जंगम मालमत्तेचा, धराचा लिलाव करणे ह्या बाबी इच्छा नसतांना सुद्धीने कराव्या लागतात, तसेच जमानतदारांना, संबंधीत कार्यालयाचे प्रमुखांना पत्र देणे इत्यादी बाबी टाळण्यासाठी कर्जदारांनी नियमित परतफेड करावी. कर्ज देतांना बँकेने कर्जदारास सहकार्य केल्याने कर्जदारांनी तत्परतेने कर्जाची नियमितपणे परतफेड करावी ही आग्रहाची विनंती.

बँकेने अहवाल वर्षात एकुण ८१ थकीत कर्जदारांवर कार्यवाही सुरु केली आहे. अहवाल वर्षा थकीत कर्ज रु.६९,७३,२२२/- लक्ष वसुल केले आहे.

संचालकाकडील कर्ज :-

अहवाल वर्षात बँकेने कोणत्याही संचालकाला कर्ज वितरीत केले नाही. संचालक अथवा त्यांचे नातेवाईकांना कर्ज घेण्यावर रिझर्व बँकेने बंदी घातलेली आहे. अहवाल वर्षामुर्दीचे एकूण रुपये ३१.७४ लक्ष कर्ज संचालकाकडे असुन त्याची एकुण कर्जाची २.४४ टक्केवारी आहे. तत्कालीन नियमाप्रमाणे सदर कर्ज दिलेले असुन त्यांची वसुली सुरू आहे.

कर्जवसुली :-

अहवाल वर्ष २००४-२००५ मध्ये एकूण रूपये २५५.२६ लक्ष बँकेने वसुल केलेले आहे. अहवाल वर्षापर्यंत एकूण रु. १३०२.०१ लक्ष बँकेने कर्ज वितरण केले व एकत्रित व्याज १७८.९६ लक्ष बँकेला मिळाले. अहवाल वर्षात काही महत्वाच्या कर्जप्रकार निहाय वसुलीचा तपशील खालील प्रमाणे आहे (आकडे लाखात)

अ.क्र.	कर्जप्रकार	कर्जरक्कम	कर्जमागणी	कर्जरक्कम वसुल
१.	सेल्फ्अर्ड पर्सनल लर्ज	२५४.५५	९९.१४	८७.०४
२.	हाऊस मॉर्टगेज कर्ज	२२४.२२	१२४.१७	१९५.३२
३.	हायपोथिकेशन कर्ज	३६.२९	१९.१२	१८.०२
४.	वैयक्तिक लोन कर्ज	७.५०	७.६५	५.५४
५.	वाहन कर्ज	५६.२३	३०.४८	२९.२७
	एकूण	५७८.७९	२८०.६७	२५५.२६

नियमितपणे कर्जपरतफेड करणारे सभासद बँकेचा हितचिंतक असून बँकेला अशा कर्ज देणाऱ्या लाभधारकांमुळे फायदा होतो. जे कर्जदार नियमित कर्जाची परतफेड करित नाही त्यांच्यामुळे बँकेला व्याज मिळत नाही, उलट मिळालेल्या उत्पन्नातून अनुत्पादक कर्जाकरीता तरतुदी कराव्या लागतात. अहवाल वर्षात एकूण अनुत्पादक कर्ज रकम रुपये १८२.०४ वर एन.पी.ए. तरतुद रु. ५३.९२ केलेली आहे. रिझर्व बँकेने विवेकपूर्व नियंत्रण लागू केलेले असुन अनुत्पादक कर्जाकरीता ९० दिवस कर्ज खात्यावर व्याज व विदेश हप्ता न परल्यास गेल्यास कर्जखाते अनुत्पादक घोषित करण्याचे सुचित केले त्यामुळे बँकेला सदर अनुत्पादक कर्जाकरीता जास्त तरतुद करावी लागली. बँकेचे नवत अनुत्पादक कर्ज रु. ४.८१ टक्केच आहे. **५ टक्केच्या आत एन.पी.ए. असणे ही बाब जमेची आहे परंतु ०% एन.पी.ए. पर्यंत प्रयत्न करणे गरजेचे आहे.** कर्ज वसुलीचे प्रमाण ९० टक्के आहे ही बँकेकरीता जमेची बाजू आहे. बँकेच्या थकीत खातेदारकांना जमानतदारांनी तसेच भागधारकांनी सुद्ध सहकार देण्याचा बँकेचे वसुली अधिकारी, कर्मचारी वर्गाचे तसेच संचालकांच्या कसोशीच्या प्रयत्नांना यश मिळेल तेव्हा सर्व भागधारकांचे, डिपॉझिटकर्ते सहकार्य अबाधित लाभेल हे अशेला बाळगणे व्यवहार्य आहे. काही वसुली मध्ये कर्जदारकांनी बदनामी होवो, न्यायालय कर्ज प्रकरणास ४ टक्के अधिक व्याजदर व कोर्ट तसेच इतर खर्चाचा भुर्दंड सहन करावा लागतो. **थकीत कर्जधारकांनी तात्काळ थकीत कर्जाचा भरणा करून आपले खाते नियमित करावे असे संचालक मंडळाच्यावतीने आवाहन करतो.**

अहवाल वर्षात बँकेला एकूण २४ कर्ज प्रकरणात वसुलीचे प्रमाणपत्र मिळालेले असुन १४ प्रकरण सहकार न्यायालयात दाखल केलेले आहे. सेक्युरीटाईझेशन कायदा अंतर्गत २६ कर्जधारकांना नोटीस बजावल्या असुन कार्यवाही सुरू आहे.

नफा व विनियोग :-

अहवाल वर्षामध्ये बँकेला एकूण उत्पन्न रु.२३४.५१ लक्ष आहे. त्यापैकी प्रमुख्याने कर्जावे व्याजातुन रु. १७८.९६ लक्ष, बँकेच्या व्यवहार ४.५३ लक्ष इतर ५२.०२ लक्ष उत्पन्न मिळालेले आहे. एकूण उत्पन्नातुन अनुत्पादक कर्जाकरिता रु. ६१.०५, इतर बाबींकरीता रु. २२.९२ तरतुद केलेली आहे. निव्वळ नफा रु. २० लक्ष आहे.

सन २००३-२००४ ला संचालक मंडळाने १० टक्के लाभांशाची घोषणा केली होती. बँकेचा (सी.ए.आर) १३.७६ टक्के व एन.पी.ए. ८.८३ टक्के होता. एन.पी.ए.च्या तरतुदीमध्ये आमसभेने मंजुर केलेले ७.०० लक्ष वर्ग केले. ऑडीटर नुसार नेट एन.पी.ए. २.२७ % होता. रिझर्व बँकेने व्यास स्टॅन्डर्ड असेट तरतुद वगळून १०.०८ दर्शविले. व आमसभेनंतरची तरतुद शासु धरली नाही. त्यामुळे अद्यापही १० टक्के लाभांश वाटप करण्याची अनुमती देलेली नाही. २००३-२००४ ला बँकेला वेळेची नफा झालेला होता. लाभांशाची तरतुद सुद्धा आहे. परंतु एन.पी.ए. १०.०७ टक्के ३१.०३.२००३ असल्याने अनुमती देलेली नाही. म्हणन व पत्र व्यवहार सुरू आहे. रिझर्व बँकेच्या मंजुरी नंतर सदर लाभांश वाटप करण्यात येईल.

अहवाल वर्षात सर्व नियमानुसार तरतुदी करुन संचालक मंडळ १५ टक्के लाभांश देण्याचे प्रस्तावित करीत आहे.

सन २००४ - २००५ चा एकूण			
शुद्ध निव्वळ नफा		रु.	२०,००,०००/-
नफ्याचे विनियोग -			
वैधानिक निधी एकूण नफ्याच्या २५% (जाचया प्रमाणे)		रु.	५,००,०००.००
लाभांश १५% (सन २००४ चे धारण्डवलावर)		रु.	१५,९४,६०८.००
	एकूण	रु.	१६,९४,६०८.००
उर्वरित नफ्यातुन तरतुद	नफा	रु.	३,०५,३९२.००
लाभांश समकरण निधी		रु.	१०,०००.००
गुंतवणुक जोखीम व इतर निधी		रु.	१,०५,३९२.००
कल्याण निधी		रु.	१०,०००.००
इमारत निधी		रु.	१,००,००० ००
एकूण		रु.	३,०५,३९२.००

सहकारी बँकांच्या दर्जात्मक विकासकरीता रिझर्व बँकेचे विवेकपुर्ण नापदंड व आंतरराष्ट्रीय निकषाच्या तरतुदी अमलात आणल्यानंतर देखील आपली बँक सातत्याने लाभांश जाहीर करीत आहे हे प्रोत्साहित करणारी व अभिमानाची बाब आहे. हमीच्या दरापेक्षा लाभांश दर जास्त आहे. त्यामुळे अतिरिक्त भाग खरेदी अपेक्षीत आहे. निःस्वार्थ संचालक मंडळ कर्तव्यदक्ष व नियमित कर्ज वसुली यामुळेच नफा मिळवीत आहे हे निर्विवादपणे नमुद करावे वाटते.

संचालक मंडळ सभा व विविध समिती सभा :-

जानेवारी २००१ पासून कार्यरत असलेल्या १५ सदस्यांच्या संचालक मंडळामध्ये ४ स्त्री सदस्य आहेत. १ सदोजात शास्त्रीय अभियंता, २ समाज सेवक कॅटेगरी, २ ॲडव्होकेट, २ प्राध्यापक महिला सदस्य, १ जिल्हा सहकारी बँकेचे मा. प्रबंध संचालक, २ महिला समाज सेवा अभिलाषी व उद्योजक महिला, १ शेतकरी, १ कुशलतज्ञ असे विविध कार्यक्षेत्रातील सर्व वैशिष्ट्यपुर्ण संचालक कार्यरत आहेत.

"द बँकिंग रेग्युलेशन (अमेंडमेंट) ॲक्ट नियामनिअस प्रोव्हिजन बिल २००३" नवीन तरतुदी नुसार ५१ टक्के संचालक विविध विषयातील तज्ञ पाहुण्याने जमा खर्च, ग्रामीण अर्थशास्त्र, शेती, बँकींग, सहकार, अर्थकारभार, कायदा, सायन्स व तंत्रज्ञान, लघुउद्योग, बँकींग व्यवसायातील ज्ञान असणारे संचालक असणे अनिवार्य आहे. सदर कायदा अस्तित्वात येण्यापुर्वीच आपल्या बँकेचे संचालक मंडळ निकषा प्रमाणे कार्यरत आहे.

संचालक मंडळाच्या नियमित सभा होत असून, आढावा वर्षात एकुण १७ सभा मधुन बँकेच्या हिताचे विविध निर्णय घेण्यात आले. संचालक मंडळाचे व बँकेचे कामकाज सुलभ होण्याकरीता कर्ज समिती, अंकेक्षण समिती, स्टाफ समिती, आणि संपूर्ण संगणीकृत बँक असल्याने स्वतंत्र संगणक समिती स्थापन करण्यात आलेत. समित्याचे कामकाज कोणताही स्वतंत्र मेहनताना घेते न घेता सुचारू पद्धतीने सुरू होते व सर्व समित्यांचे विविध निर्णयाकरीता आवश्यक मार्गदर्शन लाभले.

संचालक मंडळातील तसेच विविध समितीच्या सर्व संचालकांनी अल्पा दरांनी विनामूल्य समाजहित, बँकहित लक्षात घेऊन Pay Back to Society या भावनेने दान केलेले आहे. याबद्दल सर्व संचालक सहकार्याचे व समिती सदस्याचे आभार.

संचालक प्रशिक्षण :-

संचालकांना बँकींग क्षेत्रातील विविध सेमिनार, प्रशिक्षण, अभ्यासवर्गाकरीता पाठविणे सहकार खात्याने बंधनकारक केलेले आहे व ते अत्यंत आवश्यक असल्याने व भविष्यात अधिक स्पर्धात्मक युगात प्रगती साध्य करण्यासाठी नविन ज्ञान निष्णात्वाकरीता संचालकांना सहकार खात्याच्या आराखड्याप्रमाणे प्रशिक्षणास पाठविण्यात येते.

लेखा परिक्षण :-

सन २००४-२००५ या आढावा वर्षाचे लेखा-परिक्षण मा. श्री. बागडे साहेब, जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग १, सहकारी संस्था अमरावती यांनी व त्यांचे सहकारी यांनी केले. बँकेचा आढावा छपाई पर्यंत अंकेक्षण आढावा अप्राप्त आहे. ऑडीट निरीक्षणाच्या व मार्गदर्शनाच्या अनुपालनाने बँकेला अ वर्गाचे गुण मिळतील हि खात्री आहे.

अंतर्गत अंकेक्षण :-

मे. हिंगे एस. जयाय, चार्टर्ड अकौन्टंट यांनी अंतर्गत अंकेक्षण केलेले असून दिलेल्या सूचनावर त्वरीत व्यवस्थापकीय स्तरावर कार्यवाही करण्यात आली.

बँकींग व्यवहार :-

जिजाऊ बँकेमध्ये सर्व प्रकारचे बँकींग व्यवहार सकाळी ११ ते सायंकाली ६ पर्यंत होतात. सभासदांच्या रिजेनुसार कर्ज, कोणत्याही व्यवसायाच्या ठेवी स्वीकारण्यात येतात. चालू, बचत, धार्मिक बचत खाते उघडणे, अत्यंत कमी दरात डिमांड ड्राफ्ट देणे, बिल क्लिकरणे, चेक कलेक्शन कोणत्याही शहराकरीता डी.डी. आणि राष्ट्रीयकृत बँकेहुन कमी दरात देणे, ग्राहकांना सरपोच डि.डी. व बचत खात्याची रु. २०,०००/- रक्कम चेक सरपोच देण्याची सुविधा आहे. विदुत देयके बँकेत स्विकारली जातात.

कर्मचारी वर्ग व प्रशिक्षण :-

बँकेच्या ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सेवांचे महत्त्वाचा भाग म्हणजे कर्मचारी वर्ग. बँकेने तत्पर व दुरगामी सेवा लाभली असून सेवा विषयी तक्रारी किंवा सूचना नाही. बँक कर्मचाऱ्यांनी त्यांनी दिलेली सेवा व बँकेचा वाढविलेल्या नावलौकिक या करीता कर्मचारी कौतुकास पात्र आहेत. सहकारी बँकेमध्ये बँकेचे हित हे सर्वांचे हित असल्याने सर्व कर्मचारी निर्धारित वेळेपेक्षा जास्त काम करून सेवा देत असतात हि अभिनंदनीय बाब आहे. स्पर्धात्मक युगात ग्राहकांना अधिक संतुष्ट, जलद व विश्वासपूर्ण सेवा देण्याकरीता ते अधिक सहकार्यशील होणे ही काळाची गरज आहे.

दैनंदिन व्यवहारात पारदर्शकता येण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक असल्याचे मत संचालक मंडळाचे असल्याने आवश्यकतेप्रमाणे कर्मचाऱ्यांना सहकार प्रशिक्षण संस्था अमरावती, वनामंअमरावती यासारख्या नामांकित सहकारी प्रबंध संस्थान व पेंढारी बँकेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रशिक्षण वर्गाला पाठविण्यात आलेले आहे.

बँकेस अतिथींचे भेट आणि आभार :-

आपल्या बँकेचा "वर्धापन दिन" विजया दशमीला म्हणजे निश्चित दरवर्षी बँकेच्या कार्यालयात सकाळी ११.०० वाजता साजरा करण्यात येतो. चौथ्या वर्धापन दिनाचे सन्माननीय अतिथी मा. आमदार बी.टी. देशमुख यांनी बँकेच्या क्षेत्राचे गुलशनात विश्वासाहर्ता यावर प्रकाश टाकून शुभेच्छा दिल्या. माँ जिजाऊच्या नावे असलेली हे बँक जीवओतून काम करण्याचे संचालक असल्याने अल्पावधीमध्ये बँक सदृढ प्रगती करीत असल्याचे प्रतिपादन केले. प्रमुख अतिथी मा. रविंद्रसिंग जाधव, जिल्हाधिकारी, अमरावती यांनी बँकेची विश्वासार्हता, लोकप्रियता दिवसेंदिवस वृद्धिगत होत असल्याचे म्हटले. अमरावती जिल्हा पालकमंत्री मा. डॉ. सुनिल देशमुख यांनी बँकेच्या शिस्तबद्ध कार्यपद्धती प्रशंसा केली, तसेच मा. श्री. काळभोर साहेब, उपनिबंधक सहकारी संस्था यांनी बँकेस अहवाल वर्षात सर्वोच्च नफा देऊन बँक सदृढ असल्याचे मत प्रतिपादन केले. व्यासपीठावर श्री. विजयराव कोलाळे, प्रसिद्ध उद्योगपती शंकररावजी जाधव व अभियंता विवेक साळवे, अध्यक्ष देवीदास गणोजी हिंगणकर उपस्थित होते.

राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब जिजाऊ यांच्या ३३० व्या पुण्यतिथी निमित्त जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्षा सौ.मयुराताई देशमुख यांनी माँ जिजाऊंच्या कार्याचा गुणगौरव करून ऐतिहासिक वारसा घेऊन मुलांना छत्रपती शिवरायांच्या प्रमाणे समाजशील, चारित्र्यसंपन्न, राष्ट्रप्रेमाचे धडे देण्याचे सांगितले. महिलांना आवाहन केले. कार्यक्रमाला शहर अध्यक्षा सौ. रोहिनीताई बळी उपस्थित होत्या.

नविन उपक्रम :-

राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊंच्या १२ जून २००४ व्या ३३० व्या पुण्यतिथी दिनानिमित्त अहवाल वर्षात बँकेने जिजाऊ स्मृती बुद्धीबळ स्पर्धांचे दरवर्षी आयोजन करण्याचे ठरविले. कुशाग्र बुद्धीमत्ताविकास, एकाग्रता व स्पर्धेतून जन्मती आणि राष्ट्रीय स्तरावरील बुद्धिबळ पटू निर्माण व्हावेत या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या स्पर्धेचे उद्घाटन प्रसिद्ध युवा उद्योजक मा. अभियंता संजय जाधव यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तर दैनिक लोकमतचे जिल्हा प्रतिनिधी श्री. गजानन जानभोर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सदर स्पर्धा खुल्या व १५ वर्ष खालील वयोगटात घेण्यात आल्यात स्पर्धेमध्ये अमरावती शहरातील असंख्य बुद्धिबळ पटूनी उत्स्फुर्त सहभाग घेतला. सदर स्पर्धेमध्ये झालेल्या स्पर्धा विषयी शहरात बँकेचा चांगलाच प्रचार व प्रसार होऊन अमरावती जिल्हा बुद्धीबळ संघटनेचे अध्यक्ष श्री. लाठीया तसेच कार्याध्यक्ष श्री. राखेवार यांचे सहकार्य लाभले. बक्षीस वितरण समारंभाला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. प्रकाश खोडके, तथा उद्योजक श्री. सी. एल. खत्री यांनी स्पर्धकांना बक्षीसे वितरीत केली व बँकेच्या उपक्रमाची प्रशंसा केली. राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू प्रतिक पोगरे यांनी एकाच वेळी ५० खेळाडू समवेत खेळून नवा विक्रम केला. तर त्यांचे व अभियंता दिनेश गुप्ता यांचे स्पर्धा यशस्वीते साठी चांगलेच योगदान लाभले. प्रमुख अतिथींमध्ये कार्यकारी अभियंता श्री. सुधाकर मुरादे, लोकमत समाचार जिल्हा प्रतिनिधी संजय पंडया यांची उपस्थिती होती.

संचालक मंडळ मार्गदर्शकाच्या चमूने अहवाल वर्षात बँकेस भेट देवून मार्गदर्शन केलेल्या सर्व अतिथींचे मनःपुर्वक आभार मानतो.

ऋणनिर्देश व आभार :-

जिजाऊ बँकेच्या प्रगतीमध्ये, दशकभ्यो जिजाऊ बँकेचे सन्माननीय भागधारक, बँकेचे देणीदार, कर्जदार, व्यापारी एजन्सीज, दैनंदिन ठेवी जमा करणारे दैनिक संग्राहक, कर्मचारी वर्ग, कर्जाची नियमित वसुलीकरणारे कर्जदार सभासद, ग्राहक व हितचिंतकांचे सिंहमोलाचे सतत असून त्यांचे ऋणनिर्देश करणे कर्तव्य समजतो. बँकेच्या मागणी प्रमाणानुसार वसुली पाठविणारे सर्व कार्यालयाचे तसेच प्रत्यक्षपणाने सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे, जलसंपदा, जिवन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी, इत्यादी कार्यालयातील प्रमुख व वसुलीशी निगडीत कर्मचारी या सर्वांचे सहकार्याबद्दल आभार.

सहकार खात्याचे अधिकारी, **श्री. काळभोर साहेब, सहनिबंधक, श्री. झळके साहेब, उपनिबंधक, तालुका उपनिबंधक श्री. उल्हे साहेब** यांनी तसेच रिझर्व बँकेचे यु.बी.डी.चे महाप्रबंधक आनंदप्रकाश साहेब व वासु साहेब या सर्वांनी वेळोवेळी जे मार्गदर्शन व सूचना केल्या त्याबद्दल त्यांचे मनःपुर्वक आभार तसेच भविष्यात सर्वांचे सहकार्य मिळेल हा विश्वास वाटतो.

बँकेला लिलाजरीन सेवा देणारी युको बँक व तेथील कर्मचारी, स्टेट बँक ऑफ इंडियाचे सन्माननीय शाखाप्रबंधक **श्री भोयर साहेब व त्यांचे सर्व कर्मचारी**, अमरावती जिल्हा बँकेचे अध्यक्ष व कर्मचारीवर्ग, एच.डी.एफ.सी बँक तसेच अ‍ॅक्सीस बँक, बँकेचे **श्री. मोहन हरदास** संगणक सेवा पुरविणारे व्हेरो कंपनीचे प्रबंध संचालक **अजय वैद्य** तसेच त्यांचे कर्मचारी वर्ग, संगणक कमेटीचे सदस्य, बँकेला वेळोवेळी मदत करणारे सर्व स्टेशनरी, निमस्टेशनरी व खरेदी कार्यालय, मराठा सेवा संघ, मराठा मंदिर, अमरावती शहरातील वृत्तपत्र संपादक / जिल्हा वार्ताहार व कर्मचारी तसेच ज्यांचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मार्गदर्शन वा सहकार्य बँकेला प्राप्त झालेल्या सर्वांचे संचालक मंडळाच्या वतीने मनःपुर्वक आभार.

बँकेच्या कामकाजात संचालकांचे, कर्मचाऱ्यांचे बहुमोल सहकार्य लाभले त्याबद्दल त्यांचे विशेष आभार.

अहवाल वर्षात बँकेचे संस्थापक चे. श्री. बा. बा. लगाळ यांचे अपघाती निधन झाल्याने त्यांच्या कुटुंबियांना जिजाऊ बळ देवो हि प्रार्थना. तसेच ज्या सभासदांना देवाज्ञा झाली त्यासर्वांना बँककडून 'विनम्र श्रद्धांजली', तसेच माँ जिजाऊंची प्रेरणा त्यांचे कुटुंबीयांना संघर्षमय जिवनात नव्या आशा आकांक्षेने नवी क्षितिजे गाठण्यात कणखरपणा देईल हि प्रार्थना !

समारोप :-

विधायक दृष्टिकोन सर्जनशील सहकाराचे अंग आहे ! सहकार क्षेत्र गुंतागुंत करण्यासाठी समाजहित हा केंद्रबिंदू धरून आपण सर्व **जिजाऊ बँक** सहकार क्षेत्रातील अग्रगण्य बँक व समाजाच्या विश्वासाचे प्रतिक म्हणजेच जिजाऊ बँक असा नावलौकिक कमवण्यासाठी आपल्या सर्वांच्या सक्रीय सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतो.

रा.देवच्छ पुर्वक अहवाल सादर.

जय जिजाऊ ! जय शिवराय ! जय सहकार !

संचालक मंडळाच्या वतीने
आपला स्नेहांकित,

अविनाश कोठाळे
MIE, LLB, ADIM, DMM.
अध्यक्ष

JIJAU COMMERCIAL CO-OPERATIVE BANK LTD. (MAIN BR.)

BALANCE SHEET AS ON 31/03/2005

AMOUNT 31/03/2004	LIABILITIES	AMOUNT 31/03/2005	AMOUNT 31/03/2004	ASSETS	AMOUNT 31/03/2005
	AUTHORISED SHARE CAPITAL	1,00,00,000=00		1] CASH IN HAND	
	1] SHARE CAPITAL		2730083.00	1) Cash in Hand	1296276.00
713056.00	1) Individuals				
7251000.00	2) Shares	10217275.00	2730083.00		1296276.00
7964056.00		7964050.00			
	2] FUNDS			2] BALANCE WITH BANKS	
655304.00	1) Reserve Fund	1667944.00	1855224.92	1) C/A with M.S. Co-op. Bank Mumbai	361769.51
1194012.00	2) Building Fund	3046939.00	54352.81	2) C/A with M.S. Co-op. Bank Nagpur	45814.81
51000.00	3) Dividend Equilisation Fund	111700.00	16487.99	3) C/A with State Bank of India	47290.99
246071.00	4) Bad & Doubtful Debt Fund	611617.00	--	4) C/A with Punjab National Bank	1064285.00
1634489.00	5) Depreciation Fund	--	--	5) C/A with The Bank of Rajasthan Ltd.	500000.00
217778.67	6) Investment Fluctuation Fund	764840.23	26897.90	6) C/A with M.S. Co-op Bank Amravati	20490.90
--	7) Share Holder Welfare Fund	100000.00	2135424.67	7) C/A with Uco Bank	11227430.20
4059282.67		11503040.23	118031.58	8) C/A with A.D.C.C. Bank, Amravati	1322261.58
	3] DEPOSITS		5840.00	9) C/A with Allahabad Bank, Amravati	--
14998822.00	1) Double Benefit Deposit	14769382.00	4312468.87		14809033.05
12090500.00	2) Monthly Income Plan	13092765.00			
7907899.00	3) Short Term Deposit	8018821.00		2] A] BALANCE WITH OTHER B ANK	
543850.00	4) Monthly Recurring Deposit	611725.00	496.07	1) C/A with I. D.F.C. Bank, Nagpaur	4196792.04
1944140.19	5) Savings Deposit	22568532.73	730.13	2) C/A with I.D.B.I. Bank, Nagpur	1784473.06
8056585.93	6) Current Deposits	20436582.40	1226.20		5980665.10
4415440.00	7) Daily Recurring Deposit	3271543.00			
2127536.66	8) Jijau Saving Link Deposit	7844418.33			
63584.00	9) Staff Security Deposit	63584.00		3] INVESTMENT	
20000.00	10) Rajshree Shahu Bima Sanchay Yo.	--	8050000.00	1) F.D.R. with A.D.C.C. Bank	8055000.00
1500050.20	11) Rajshree Shahu Shikshan Yojana	1310050.00	1000000.00	2) F.D.R. with Uco Bank	--
--	12) Employees Provident Fund	17072.00	2300000.00	3) State Bank of India, Amravati	--
144236825.50		164353844.43	11350000.20		8055000.00

AMOUNT 31/03/2004	LIABILITIES	AMOUNT 31/03/2005	AMOUNT 31/03/2004	ASSETS	AMOUNT 31/03/2005
183457091.07	TOTAL LIABILITIES B.F..... ...	211129260.04		7] BILLS FOR COLLECTION	
			410894.00	1) Inward Bills Receivable	278787.95
			3914817.00	2) Outward Bills Receivable	1282501.00
			4325711.00		1561288.95
				8] OTHER DEPOSITS	
			6000.00	1) With Telephone	6000.00
			25000.00	2) With M.S.E.B.	45000.00
			31000.00		51000.00
				9] STOCK & STORES	
			135411.50	1) Dead Stock & Furniture	283488.50
			891050.00	2) Computer & Peripherals	80947.00
			181722.00	3) Office Equipment	18031.00
			173097.00	4) Electrical installation	--
			5059.00	5) Misc. Assets	--
			2536139.50		361966.50
				10] OTHER ASSETS	
			42500.00	1) Sundry Debtors	31000.00
			6076305.40	2) Unclaimed Clearing	--
			6118805.40		31000.00
			--	11] BANK GUARANTEE	--
183457091.07	TOTAL LIABILITIES	211129260.04	183457091.07	TOTAL ASSETS	211129260.04

sd / S.W. Raut
MANAGER
J.C.C. Bank Ltd., Amt.

sd / Rajendra S. Jadhao
VICE CHAIRMAN
J.C.C. Bank Ltd., Amt.

sd / Avinash A. Kothale
CHAIRMAN
J.C.C. Bank Ltd., Amt.

PROFIT & LOSS STATEMENT
FOR THE 31.03.2005 EXPENDITURE

Ac. No.	Particulars	AMOUNT	AMOUNT
1	**A) INTEREST PAID ON DEPOSITS**		
	1. Double Benefit Deposit	1925010.00	
	2. Monthly Income Deposit	1548369.34	
	3. Short Term Deposit	7759175.00	
	4. Monthly Recurring Deposit	72578.00	
	5. Daily Recurring Deposit	41608.00	
	6. Saving Deposits.	760220.00	
	7. Jijau Saving Link Deposit	302121.00	
	8. Rajshree Shahu Birna Sanchay Yojan	5976.00	
	9. Rajshree Shahu Shikshan Yojna	235424.00	
			12650561.34
2.	**COMMISSION & BORKERAGE**		
	1. Commission Paid to Banks	9672.03	
	2. Commission Paid to Agents	310637.00	
	3. Other Commission	29337.00	
	4. Int. Pad on Govt. Securitis	350.58.55	
	5. Commission Paid on Govt. Securitis	11978.78	
	6. Service Charges Paid on Govt. Securitis	0.00	
			396683.36
3.	**B) ESTABLISHMENT EXPENSES**		
	1. Basic Pay	467308.00	
	2. Contribution to P.F.	72305.00	
	3. Closing Allwance	8000.00	
	4. Security Guard Charges.	2800.00	
	5. Contribution to Employees Insurance Scheme	1815.00	
	6. Other Establishment Expenses	129720.00	
			681946.00
4.	**RENT, RATES & TAXES**		
	1. Rent for Bank Premises	108240.00	
	2. Taxes For Bank Premises	27276.00	
	3. Service & Maintenance Charges	105803.00	
	4. Subscription & Contribution	751.00	
			243070.00
5.	**WATER & ELECTRICITY CHARGES**		
	1. Electricity Charges	79912.00	
	2. Wather Charges/taxes	3000.00	
			82912.00
6.	**POSTAGE, TELEGRAM / TELEPHONE**		
	1. Postage Charges	4337.00	
	2. Telegram Charges	55.00	
	3. Telephone Charges.	40995.00	
	4. Other Stamp Charges	733.00	
	5. Fax Charges	764.00	
			85898.00

Ac. No.	Particulars	AMOUNT	AMOUNT
7.	**PRINTING & STATIONERY**		
	1. Stationery Printing Charges	68765.00	
	2. Stationery Purchase	21876.00	
	3. Xerox Charges	9998.00	
			100641.00
8	**NEWS PAPERS &PERIODICALS**		
	1. Exp. For News Papers.	604.00	
	2. Exp. For Periodical / Books	2289.00	
			2893.00
9	**REPAIRING CHARGES**		
	1. Repairing Charges - Building	9032.00	
	2. Repairing Charges - Electrical Equipement	705.00	
	3. Repairing Charges - Computer Hardware	5290.00	
	4. Repairing Charges - Computer Software	6000.00	
	5. Other Repairing Charges.	4523.00	
			25550.00
10	**CONVEYANCE CHARGES**		
	1. Conveyance Charges for Cash Transit	8470.00	
	2. Conveyance Charges Other	8228.00	
			16698.00
11	**CLEARING HOUSE CHARGES**		
	1. Clearing House Charges	9000.00	
			9000.00
12.	**INSURANCE CHARGES**		
	1. Ins. Charges for Cash in Safe/Transit	35537.00	
	2. Ins. Charges for Bank Property	865.00	
	2. Ins. Charges Paid to DI & CGS	245088.00	
			281290.00
13.	**OFFICE EXP**		
	1. Office Expenses	47290.00	
	2. Function / Anniversary Exp.	19413.00	
			66703.00
14.	**MISCELLENCES EXPENSES**		
	1 Miscellences Expenses	1938.00	
			1938.00
15.	**OTHER EXPENSES**		
	1. Travalling Expenses	120.00	
	2. Computer Peripherals.	3145.00	
	2. Expenses for AMC (Computer)	89000.00	
	3. Expenses for AMC (Note Counting Machine)	9590.00	
			101855.00
16.	**GOVERNMENT TAXES/FEES**		
	1. Professional Tax	1500.00	
	2. Shops & Establishment Fees	2700.00	
			4200.00
17.	**FEES PAID TO ASSOCIATINONS**		
	1. Fees Paid for Membership To Association	15500.00	
			15500.00

Ac. No.	Particulars	AMOUNT	AMOUNT
18.	**ADVERTISEMENT EXPENSES & PUBLICATION**		
	1. Advertisement Exponses & Publicat on	45347.00	
			45347.00
19.	**LAW CHARGES**		
	1. Legal Charges Paid for Court Cases	30375.00	
	2. Other Law Charges	5000.00	
			35375.00
20.	**ADUIT FEES**		
	1. Other Aud t Fees	16592.00	
	2. Audit Fee Paid For Statutory Aud t	75000.00	
	3. Audit Fee Paid for Interna Aud t	58980.00	
	Year Amount		
	A) Audit 03-04 12960.00		
	B) Provision 04-05 35000.00		
	C) E.D.P 11020.00		
	58980.00		
	4. Audit Fee Paid For Aucit By. C.A.	10640.00	
			163212.00
21.	**EXPENSES FOR DIRECTORS**		
	1. Meeting Expenses	745.00	
	2. Travelling Allowance to Directors	333.00	
			1078.00
22.	**A.G.M. EXPENSES**		
	1. Expenses for Annual Report	13250.00	
	2. Postage For A.G.M.	5530.00	
	3. Other Exp. For A.G.M.	6980.00	
			25760.00
23.	**DEPRECTATION**		
	1. Dep. for Computers & Peripheral	233084.00	
	2. Dep. for Other Assets.	37871.00	
	3. Dep. for Deac Stock & Other Moveable Ass.	253004.00	
			524759.00
24.	**PROVISION AGAINST EXPENSES**		
	2. Prov. for Education Fund.	10000.00	
	3. Prov. for Bonus	40000.00	
	4. Provision for Intt. on NPA Account	2014417.00	
	5. Provision For N.P.A.	3220383.00	
	6. Provision For B.D.D.R.	450000.00	
	7. Provision for Guatuity	29700.00	
	8. Provision for Investment Fluctuation Fund	107063.06	
			5871563.06
25.	**EXPENSES ON ELCTION**		NILL
26.	**TRAINING EXPENSES**		
	1. Employee Training Exps.	16576.00	
			16576.00
	NET PROFIT	2000000.00	
			2000000.00
	GRAND TOTAL	**23451010.75**	**23451010.75**

sd / S.W. Raut
MANAGER

sd / Rajendra S. Jadhao
VICE CHAIRMAN

sd / Avinash A. Kothale
CHAIRMAN

PROFIT & LOSS STATEMENT FOR THE 31.03.2005 INCOME SIDE

Ac. No.	Particulars	AMOUNT	AMOUNT
1.	A) INTEREST RECEIVED ON LOANS & ADVANCES		
	INTEREST RECEIVED ON DEMAND LOANS		
	1. Against Double Benefit Deposit	106963.00	
	2. Against Short Term Deposit	280221.00	
	3. Secured Cash Credit	9089547.00	9231627
	4. Hypothecation Instalment Loan	531531.00	
	5. Intt. received on House Morgage	3653128.00	
	6. Intt. received on Vehicle.	729866.00	
	7. Against Govt. Security	113694.00	
	8. Unsecured Personal Loan	113106.00	
	9. Secured Personal Loan	2367246.00	
	10. Intt. Received on Loan Against Public Issu.	948.00	
	11. Against Rajshree Shahu Shik. Yojna	4533.00	
	12 Against Monthly Income Plan	76079.00	
	13. Against Recurring Deposit	8112.00	
1.	B) INTT. RECEIVED ON INVESTMENT		17796451.80
	1. Intt. Received on F.D. Receipts with MSCB	3493.00	
	2. Intt. Received on F.R. Receipts with Other Bank	14508.00	
	3. F.D.R. with DCC Bank	72409.00	
	4. F.D.R. With A.D.C.C.Bank	715818.00	
	5. Intt. Received on Govt. Securities	3030651.17	
	6. Income on Sale/Purchases of Govt. Security	133600.00	
	7. Intt. Received on F.D.R. with S.B.I	32584.00	
1.	C) INTT. REC. ON BILL PURCHASE & DISCOUTED		4002763.17
	1. Bill Discounting	71288.00	
1.	D) COMMMISSION & BROKERAGE		71288.00
	1. Commission on DD/ Payorders	304957.17	
	3. Commission on OBC	71102.50	
	4. Commission on M.S.E.B. Bill	5739.00	
1	E) OTHER RECEIPTS / INCOME		381808.67
	1. Sale of Loan Forms	33700.00	
	2. Rent Locker	21400.00	
	3. Loan Processing Fees	433077.00	
	6. Seva Shulk	255951.02	
	8. Misc. Receipts / Income	159619.00	
	7. Cheque Return Charges.	295142.00	
			1198699.02
	GRAND TOTAL	23451010.76	23451010.76

sd / S.W. Raut
MANAGER
J.C.C. Bank Ltd., Amt.

sd / Rajendra S. Jadhao
VICE CHAIRMAN
J.C.C. Bank Ltd., Amt.

sd / Avinash A. Kothale
CHAIRMAN
J.C.C. Bank Ltd., Amt.

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती

अंदाज पत्रक : २००५-२००६

अ) उत्पन्न बाजू (आकडे लाखात)

अ.क्र.	विवरण	अंदाज प. तरतुद १.४.०५ ते ३१.३.०५	दि. ३१/३/०५ पर्यंत प्रत्यक्ष उत्पन्न	अंदाज पत्रकातील वाढ/ घट	दि. ३१/३/२००६ अपेक्षित उत्पन्न अंदाज पत्रक
१.	व्याज				
	कर्जावरील	१७० ००	१६८ ००	+८.००	२१०.००
	गुं. मु.कीवरील तहहि. सेवसु.	३८.००	३०.३०	-२.३०	३५.००
	टेवीवरील व्याज मुदती ठेवी	१५.२०	८.३८	-६.८२	९१.००
	रिल डिस्काऊंटींग	७.१५	७.७१	+०.५६	१.००
२.	कमिशन	५.००	३.८२	-१.१८	५.००
३	इतर उत्पन्न				
	लोन फार्म विक्री	०.२८	०.३३	+०.०५	०.३५
	लॉकर रेंट	०.१४	०.२१	+०.०८	०.२५
	लोन प्रोसेसिंग फी	२.५०	४.३४	+१.८४	५.५०
	सेवा शुल्क	५.५०	२.५६	-२.९४	४.५०
	चेक रिटर्न चार्जेस	७.७०	२.९५	+१.९५	२.००
	इतर उत्पन्न	९.५०	१.५८	+०.०८	२.००
	सेक्युरीटी ट्रेडींग	१०.००	९.३३	+८.६७	१.००
	इन्सीडेंटल चार्जेस	--	--	--	--
	एकुण वेरीज	२३१.०९	२३४.१९	-४.११	२७२.६०

ब) खर्च बाजू

अ.क्र.	विवरण	अं. प. तरतुद	प्रत्यक्ष खर्च	अं.प. खर्च	अपेक्षित खर्च
१	व्याज				
	ठेवीवर	९४९.८०	१२६.५०	-१५.३०	९५०.००
	कमिशन व ब्रोकरेज	८.६१	३.९६	-४.६५	४.५०
२.	कर्मचारी खर्च				
	पगार	८.१४	५.२७	-२.९७	७.००
	पी.एफ. कॉन्ट्रिब्युशन	०.७०	०.७२	+०.०२	०.८५
	क्लोथिंग	०.१०	०.०८	-०.०२	०.१०
	इतर खर्च	०.१६	०.०२	-०.०८	०.०५
	सेक्युरीटी गार्ड चार्जेस (इ. खर्च)	७.०४	०.०३	-०.०१	०.०४